६) सभासद वर्गणी, नाटकांची संख्या, प्रयोगाचा खर्च हे घटक त्या शाखांत असणाऱ्या परिस्थितीनुसार आणि थिएटरमध्ये उपलब्ध असणाऱ्या आसनांनुसार बदलू शकतात.

शाखांनी परिश्रम घेऊन ही योजना राबवल्यास

१) प्रेक्षकांना उत्तमोत्तम नाटकं परवडणाऱ्या दरात पहाता येतील.
२) निर्मात्यांना नुकसान न होता प्रयोग करता येतील, प्रयोगसंख्या वाढेल.
३) परिषदेच्या शाखांची आर्थिक बाजू बळकट होईल.

अथक परिश्रम घेऊन ही योजना राबवणं शाखांच्या हातात आहे. अन्यथा ही योजना फक्त कागदावरच राहील.

प्रेक्षकांना रंगभूमीकडे वळवण्यासाठी, विशेषत: तरुण वर्गात नाटकाची गोडी वाढवण्यासाठी आणखी एक उपक्रम करता येण्यासारखा आहे. जुन्या गाजलेल्या नाटकांच्या अभिवाचनाचे कार्यक्रम. रंगभूमीवर ज्यांचे प्रयोग आता होत नाहीत अशा जुन्या गाजलेल्या नाटकांच्या अभिवाचनाचे कार्यक्रम केवळ नाट्यपरिषदेच्या शाखांनी नाही तर कार्यरत असलेल्या हौशी नाट्यसंस्थांनी बसवून त्यांचे जास्तीत जास्त प्रयोग करावेत. तसंच परिषदेच्या प्रत्येक शाखेने आंतरमहाविद्यालयीन नाट्यअभिवाचन स्पर्धेचे आयोजन करावं. सहज राबवता येऊ शकणाऱ्या या उपक्रमांचा मराठी रंगभूमीला निश्चित फायदा होईल.

आज रंगभूमीवरील सर्वात असुरक्षित गट म्हणजे रंगमंच कामगार. अतिशय कष्ट करणाऱ्या, हातावर पोट असणाऱ्या, प्रयोगसंख्येवर उत्पन्न अवलंबून असणाऱ्या रंगमंच कामगारांविषयी मला चिंता वाटते. नाट्यपरिषदेने त्यात लक्ष घालून यापूर्वीच अनेक कल्याणकारी योजना सुरु केल्या आहेत. आणखी अनेक योजना परिषदेला राबवायच्या आहेत. या योजनांकरता आर्थिक पाठबळ हवं. यात आर्थिक वाटा (मी भार म्हणत नाही. कारण तो भार नाही) उचलण्याची जबाबदारी प्रामुख्यानं निर्मात्यांची आहे असं मला वाटतं. प्रकाशझोतांत नसलेल्या या कामगारांमुळे आपण प्रकाशझोतात आणि प्रसिद्धीच्या वलयात रहातो हे आपण विसरु नये. माझं निर्मात्यांकडे छोटसं मागणं आहे. आपण प्रत्येक प्रयोगामागे फक्त एका तिकिटाचे पैसे म्हणजे शंभर रुपये परिषदेच्या रंगमंच कामगार कल्याण निधीसाठी द्यावे. हे आपल्याला जड आहे? पण त्याचं मोल किती मोठं आहे. शिवाजी मंदिर सारख्या